# औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद

**दिनांक २०/३/२००७ रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे (का.प.क्र.२४) इतिवृत्त**

**मंगळवार** दिनांक **२० मार्च २००७** रोजी स्थायी समितीची सभा (दि.१३.३.०७ ची तहकूब सभा) मा.सभापती **श्री.रेणुकादास (राजू) वैद्य** यांचे अध्यक्षतेखाली महानगरपालिका मुख्य कार्यालयातील 'मलिक अंबर स्थायी समिती सभागृह' येथे **दुपारी ३.०५ वाजता** "वंदे मातरम्" या गिताने सुरू झाली. या सभेस मा.आयुक्त, नगर सचिव व अधिकारी वर्गासह खालील सन्माननीय सभासद उपस्थित होते.

1. श्री. कावडे साहेबराव राणुबा
2. श्री. गायकवाड दिलीप नारायण
3. श्री. गवळी रविकांत काशीनाथ
4. सौ. दलाल लता श्रीनिवास
5. श्री. दाभाडे मिलींद यशवंत
6. श्री. मुजीब आलमशाह खान
7. श्री. शिरसाट संजय पांडूरंग
8. डॉ. आशा उत्तमराव बिनवडे
9. श्री. तुपे त्रिंबक गणपतराव
10. श्री. दाभाडे हिंमतराव साळूबा
11. श्री. बमणे पुनमचंद सोनाजी
12. श्री. मो. जावेद मो. इसाक

**<u>विषय क्र.279 :</u>**

**मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 95 अन्वये सादर केलेल्या, सन 2006-2007 चे सुधारीत व सन 2007-2008 चे मुळ अर्थसंकल्पावर विचार विनिमय करणे.**

**संवाद :** (दि.13.3.07 रोजीच्या तहकूब सभेतील चर्चा पुढे चालू.....)

श्री.मुजेब खान : मागिल वर्षाचा सुधारीत व चालू वर्षाचे मूळ अंदाजपत्रक सादर झालेले आहे. खेदाने सांगावे लागते आमच्या वार्डात डी. पी. रोडसाठी कुठेही तरतूद केलेली दिसून येत नाही. रोषणगेट ते किराडपूरा तसेच कटकटगेट ते रविंद्रनगर रस्त्यासाठी बजेट दिलेले नाही. मा.महापौर यांनी जेंव्हा बैठक घेतली त्यावेळी सर्व वार्डासाठी विकास कामाच्या संदर्भात समान तरतूद केली जईल असे म्हटले होते माझ्या वार्डात ४ लक्षची तरतूद केलेली आहे. अमूक कामे टाकली जतील असे प्रशासनाने अश्वासन दिले बुक तयार झाले, आज मंजूरी होत आहे कोणतेही काम त्यात आलेले नाही.अधिकाऱ्याकडे विचारणा केली असता स्थायी समिती व सर्वसाधारण सभेत कामे वाढवून घ्यावी असे उत्तरे मिळातात. अनेक वार्डासाठी चार ते पाच लक्षची तरतूद केलेली आहे, स्पील ओव्हरचा समावेश करून २५ ते ३० लक्ष काही वार्डात तरतूद दिसून येते तर स्पिल ओव्हरची कामे वगळता वार्ड क्र. ६२,६४ मध्ये प्रत्येकी ७४ लक्ष तरतूद आहे. तसेच

वार्ड क्र ९३ मध्ये ९० लक्ष तर वार्ड क्र ९४ मध्ये १.५५ कोटी तरतूद दिलेली आहे. आमच्याही वार्डात डि. पी रोड आहे. जनतेने आम्हाला विकास कामासाठी निवडून दिलेले आहे. ठराविक वार्डातच का जस्तीची तरतूद करण्यात आलेली आहे खूलासा करावा. तसेच माझ्या वार्डात ४ लक्षची तरतूद केलेली आहे. दोन वर्षापासून वार्डात कोणतेही विकास काम झाले नाही. अनेक वेळा सुचना केल्या त्याकडे लक्ष दिले जत नाही. मागिल वर्षातील स्पील ओव्हरच्या कामाचा समावेश करून चार ते पाच लक्ष दिले जते ४० लक्षचे स्पील ओव्हर केले. माझ्या वार्डात प्रशासनाने काहीच तरतूद केलेली नाही तरतूद करण्याची पध्दत बरोबर नाही. रोषणगेट येथील डी.पी. रोडचे बाजूचे नालीचे काम टाकण्याबाबत सूचना मांडली होती. ते काम यात आलेले नाही. मी पत्र आपणाकडे देत आहे ते काम यात नमूद करावे. आठ ते दहा कामे आहेत. डांबरीकरणाचेही एकही काम आलेले नाही. मूळ बजेट व यात स्पील ओव्हरची किती रक्कमेची कामे आलेली आहे याचा खूलासा करावा.

श्री.त्र्यंबक तूपे : प्रत्येक वार्डात प्रशासनाच्या वतीने किती बजेट टाकण्यात आले म्हणून चार दिवसापूर्वी मा. आयुक्तांना पत्र दिले होते. प्रत्येक वार्डात बजेट दयावे म्हणून मागिल बैठकीत सूचना मांडली होती.काही कोटीपेक्षा जस्त तर काही वार्डात ५ ते १० लक्ष पर्यत बजेटमध्ये तरतूद केली. वार्डात जेडी. पी रोडचे मोठमोठे कामे असतात त्यास प्राधान्य दयायला पाहिजेहोते. समान बजेट न ठेवता काही वार्डांनाच जस्तीचे बजेट का देण्यात आले याचा तसेच प्रत्येक वार्डात किती बजेट दिलेले आहे हा ही खूलासा करावा.

श्री.मो.जवेद मो.इसाक : प्रत्येक स. सदस्यांनी त्यांचे वार्डात विकास कामे करण्यास संदर्भात कामाची यांदी प्रशासनाकडे दिलेली आहे तरीही ती कामे यात आलेली नाही. हर्सूल वार्डसाठी १ कोटी स. सदस्य श्री. मिलींद दाभाडे यांचे वार्डात ही १ कोटीचे तसेच सौ. जैन यांचे वार्डासाठी १ कोटीची तरतूद केलेली आहे. सौ. घोडेले यांचे वार्डासाठी १ कोटी, वार्ड क्र ५८ मध्ये ९१ लक्ष तर वार्ड क्र ५२ मध्ये ९४ लक्षचे काम आलेले आहे. तरतूद केली परंतू काही वार्डात काहीच दिलेले नाही. जनतेने आम्हाला कशासाठी निवडून दिलेले आहे. विकास कामे होणार की नाही.

श्री.हिम्मतराव दाभाडे : . नागसेननगर भागात एक शौच्छालय नादुरूस्त झालेले असून ते सर्व डिमॉलीश करून बांधण्यात यावे तसेच पीरबाजर उस्मानपूरा भागात महापालिकेच्या जगेवर व्यापारी संकूल व भाजे मंडई करण्यासाठी तरतूद करावी म्हणून निवेदन प्रशासनाकडे तसेच पदाधिकारी यांनाही पत्र दिले होते तरतूद केलेली नाही ती करण्यात यावी. तसेच एकनाथनगर भागात रस्त्याच्या कडेला पेव्हींग ब्लॉक बसविण्याची मागणी केलेली होती. त्यासाठी तरतूद करावी. निश्चितच काही वार्डासाठी कमी बजेट देण्याचा भेदभाव अधिकाऱ्यानी केलेला आहे. असे होत असेल तर वार्डाचा विकास होणे शक्य नाही.

डॉ. आशा बिनवडे : खर्च बाजूवर एका अर्थाने चर्चा होत आहे परंतू जमा व खर्च या दोन्ही बाजूवर चर्चा होणे अपेक्षीत आहे. उत्पन्न मिळाले तरच खर्च करता येणार आहे.म्हणून उत्पन्न कसे मिळवले जईल यावर आधी चर्चा करावी.२३९ कोटीचे बजेट समोर ठेवलेले आहे व जमा ही २३९ कोटी होईल असा अंदाजप्रशासनाने लावलेला आहे. गेल्या वर्षी २३२

कोटीचे बजेट सादर झाले होते या वेळेस फक्त ५ कोटीनेच वाढ होवून आले नुसते कागदावरच रक्कम दाखवून स्थायी समिती व सर्वसाधारण सभा बजेट वाढवेल व प्रशासनास जे उद्दिष्ट निश्चित करायचे तिथपर्यत बजेट होईल अशी व्यवस्था यात झालेली दिसून येते. असे माझे मत आहे. जकातीच्या माध्यमातून १० ते ११ कोटी जस्त मिळेल असा दावा एकीकडे करता मालमत्ता कराची मागिल वर्षीचे उद्दिष्ट हे ३२ कोटीचे व या वर्षी २५ कोटीचे ठेवले गेले. सात कोटीने वसूली कमी कशी होते याचा उलगडा होत नाही. स्थायी समितीने ४१ कोटी तर सर्वसाधारण सभेने ४५ कोटी केले होते. सुधारीत अर्थसंकल्पामध्ये मा.आयुक्तांनी ३२ कोटीहून २७ कोटीपर्यत केलेले आहे. प्रत्यक्षात वसूली किती झाली याचा उल्लेख यात दिलेला नाही. मागिल वर्षी ३१.४० कोटीचा अंदाजप्रशासनाने ठेवला होता ते सूध्दा जस्तीचेच होते सुधारीत मध्ये १८ कोटी केले व १८.९२ कोटी वसूली झाली म्हणजेउद्दिष्ठापेक्षा जस्त वसूली केली असे चित्र दाखविण्याचा प्रयत्न प्रशासनाने केलेला आहे. कागदावर दाखविण्यासाठी हा अर्थसंकल्प मांडलेला आहे काय सुधारीत मध्ये बजेट कमी केले जते जी कामे व्हायची ती होत नाही म्हणून ७० कोटीचे पून्हा स्पिल ओव्हर दाखवायचे हेबरोबर नाही. प्रशासनाचा पगार व इतर भत्ते व इतर खर्च हा जवळपास ६५ कोटी पर्यत आहे. वाहनावरील देखभाल दुरूस्तीसाठी १ कोटी हा खर्च जस्त आहे आम्ही त्यात मान्य करणार नाही. जनतेसाठी किती खर्च करायला पाहिजे एवढा खर्च करूनही त्यांचे रिटर्न्स काय आहे.येणारे उत्पन्न व होणारा खर्च यात मोठी तफावत दिसून येते. गेल्या वर्षी पाणीपट्टी वसूलीचे ४७ कोटीचे उद्दिष्ठ ठेवले होते सुधारीत मध्ये २७ कोटी झाले वसूली किती याचा उल्लेख यात नाही.सन २००५-०६ या वर्षात ही उद्दिष्ठ ४३ कोटी सूधारीत ३१ कोटी केले असे करूनही वसूली ही ५० टक्के ही झालेली नाही. जे अंदाज ठेवला जतो तो सुध्दा अत्यंत मोठया फरकाने चूकीचा ठेवला जतो. किंवा वसूली करणारे कार्यक्षम आहे की नाही असा प्रश्न येतो. उत्पन्नच कमी व अस्थापनेवरील खर्च हा ६५ कोटी कशासाठी करायचा असा प्रश्न पडतो. भविष्यात उत्पन्न कमी येत राहिल व प्रशासनाचा खर्च वाढत जईल.विकास कामे होणार नाही वार्डातील नागरीकांना आम्ही काय उत्तरे दयायची. मागिल वर्षी ३१ कोटीचे उद्दिष्ठ ठेवले वसूली १८ कोटी झाली यास जबाबदार कोण व कूणावर जबाबदारी निश्चित केली जणार आहे. जकात खाजगीकरण केले. तेथील कर्मचारी वसूलीसाठी देवून वसूली वाढ व्हायला पाहिजे होती ती झालेली नाही. हा अर्थसंकल्प मंजूर करून घेण्याचा प्रशासनाचा प्रयत्न आहे असेच यावरून दिसून येते. यात वाढ सूचवली पाहिजे व सुचविलेली वाढ पर्यत प्रशासनाने उद्दिष्ट गाठले पाहिजे जर वसूली होत नसेल तर जबाबदारी निश्चित करावी. ४० टक्के पर्यत उद्दिष्ट कमी केले जते याला अर्थ नाही या बजेटमध्ये १० टक्केची वाढ करावी व वसूली करण्याची जबाबदारी प्रशासनावर टाकावी.

मा. आयुक्त : प्रशासनाचा होणारा खर्च कमी करण्यासाठी उपाय तसेच वसूली करण्या संदर्भात उपाय या दोन्हीबाजूवर चर्चा होणे गरजचे आहे. ३१ कोटी उद्दिष्ठ ठेवून १८ कोटीच का वसूल झाले यावर विचारविनिमय होणे गरजेचे आहे.पाणी पट्टीची ३३ कोटी ऐवजी १८ कोटीच वसूल का झाले संबधीत अधिकारी यांनी त्याचे कारण सांगावे. त्या

मागील वर्षात पाणीपट्टीची वसूली १२ ते १३ कोटी होती ती १८ कोटीवर गेलेली आहे.४० टक्के जस्त वसूली झाली परंतू सभागृहाने दिलेल्या टारगेट नूसार ५० टक्के कमी झालेली दिसून येते.

मा. सभापती : वार्ड कार्यालय नुसार किती वसूली झालेली आहे. वार्ड अधिकारी अ यांनी खूलासा करावा.

वार्ड अधिकारी -अ :वार्ड कार्यालय अ ची मालमत्ता कराची थकबाकी २.०३ कोटी चालू मागणी १.८३, एकुण ३.८६ कोटीची डिमांड त्यापैकी १.७४ कोटी वसूली ५७ टक्के वसूली झालेली आहे. बील वेळेवर गेलेले नव्हते म्हणून कमी वसूली झालेली आहे जनेवारी मध्ये बील गेलेले होते सर्वांना बील वाटप केलेले आहे.पाणीपट्टीची डिमांड ४.७५ कोटी मागिल थकबाकी ३ कोटी चालू वर्षाचे १.७५ वसूली १.०० कोटी झालेली आहे.पाणीपट्टीची वसूली ही वार्ड अभियंता करतात.

वार्ड अधिकारी -ब : ४ कोटीचे उद्‌दिष्ट होते त्यापैकी ३.२५ कोटी वसूली झाली. मालमत्ता कराची ३ कोटी सिडको सह ५ कोटीचे टारगेट होते २.०६ कोटी वसूल झालेले आहे. एमआयडीकडे थकबाकी २.७८ आहे जधववाडी व सुरेवाडी भागाची जवळपास १.५० थकबाकी निघेल.सिडकोचा सर्वे नुकताच सुरू झालेला आहे.

मा. आयुक्त : एमआडीसीची थकबाकी येणे आहे.

वार्ड कार्यालय -क : मालमत्ता कराची थकबाकी २.१८ कोटी चालू मागणी १.४५ कोटी अशी एकूण ३.६४ कोटी वसूली १.०५ वसूली झालेली आहे. वसूली जस्त न होण्याचे कारण या वार्ड अंतर्गत स्लम भाग जस्त येतो.१९८९ पासून अनेक नागरीकांनी करच भरणा केलेले नाही.आता थकबाकी जस्त झाली म्हणून आम्हाला टॅक्स मान्य नाही असे सागूंन कर भरणा करीत नाही.

वार्ड अभियंता -क : पाणीपट्टीची थकबाकी २.३३ कोटी चालू मागणी १.२६ कोटी एकूण मागणी ३.६० कोटीची होती.६२.०८ लक्ष वसूली झालेली आहे.डिसेंबर मध्ये चार्ज घेतला त्यावेळी २९ लक्ष वसूली होती पाणीपट्टीचे बिले गेलेली नव्हती. कॅम्प लावूनही या भागातून लोक वसूली देत नाही.

श्री.मुजीब खान : किती टक्के लोकांना बीले पोहचली आहेत.

वार्ड अभियंता -क : २७०० एकूण बिले देण्यात आली आणखी ६३०० बीले देणे बाकी आहे.

श्री.त्र्यंबक तूपे : अधिकाऱ्याकडे माहिती असेल तर घ्यावी नसता वेळ वाया घालवू नये.

श्री.मुजीब खान : नोटीसेस दिल्या नाही म्हणून वसूली झाली नाही. रोषणगेट भागात कॅम्प लावून ३० लक्ष वसूली झालेली आहे. डिमांड नोटीसा देण्यास प्रशासनाला वेळ नाही त्यामूळे वसूली झालेली नाही.

श्री.साहेबराव कावडे : अधिकारी उत्तरे बरोबर देत नाही. महापालिकेचे कामकाज कशा पध्दतीने चालते याकडे मा. आयुक्तांनी लक्ष दयायला पाहिजेआलेले उत्पन्न पगारामध्ये जत असेल व विकास कामे होत नसेल तर बरोबर नाही.अधिकारी जे उत्तर देतात त्याबध्दल मा. आयुक्त समाधानी आहेत का?

शहर अभियंता : पाणीपट्टीची वसूली वार्ड अभियंता यांचेकडे गेल्या वर्षीपासून सोपविली.थकबाकी मोठया प्रमाणात असून मागिल वर्षी १८ कोटी वसूल केले त्या मागिल वर्षी १२ कोटी

वसूल केलेले होते. या वर्षी ३२ कोटीची थकबाकीसह डिमांड होती. वसूली कमी झाली ही वस्तूस्थिती असून वसूलीसाठी कर्मचारी वर्ग कमी आहे.

श्री.साहेबराव कावडे : वार्ड अभियंता तसेच इतर वसूलीसाठी असलेले कर्मचारी वसूली व्यतिरिक्त इतर कामे करतात का याकडे प्रशासनाचे लक्ष नाही.

सौ. लता दलाल : कर्मचारी वर्ग कमी आहे नेहमी हेच उत्तर मिळते. गेल्या काही वर्षापासून हे लक्षात आले असेल वार्ड कार्यालय करतांना प्रत्येक वार्ड कार्यालयात किती कर्मचारी असावा याचे नियोजन का केलेले नाही. बजेट मंजूर झाल्यानंतर लगेच त्या वर्षाची वसूली करण्याची कार्यवाही का सूरू होत नाही.दर तीन महिण्याचा आढावा घेतला पाहिजे जर १०० कर्मचारी असेल त्यातील क. लिपीक किती टेक्नीकल कर्मचारी किती व त्यांचेकडे कोणते कामे दिली पाहिजे आढावा बैठक घेतल्यानंतर कोणत्या वार्डाची वसूली कमी आलेली आहे त्यांचे नियोजन करायला पाहिजे ते का केलेले नाही.प्रत्येक वेळी कर्मचारी वर्ग कमी आहे अशी उत्तरे देणे बरोबर नाही.

शहर अभियंता : प्रत्येक वार्ड कार्यालया संदर्भात आढावा बैठका घेण्यात आलेल्या आहेत.वसूलीसाठी कर्मचारी वर्ग कमी आहे.

श्री.संजय शिरसाट : एक वार्ड कार्यालयात वसूलीसाठी किती कर्मचारी आहे.नळ कनेक्शन किती आहे.

शहर अभियंता : तीन ते चार ग्रुप केलेले असून एका ग्रुपमध्ये दोन ते तीन कर्मचारी आहेत.९२-९३ हजर नळ कनेक्शन आहे १०ते १२ कर्मचारी वसूलीसाठी दिलेले आहे.

श्री.संजय शिरसाट : खूलासा केला त्याप्रमाणे वसूलीसाठी ९० कर्मचारी आहे. नळ कनेक्शनचा कर्मचारी संख्येचा विचार केल्यास वर्षभरात एक कर्मचारी ४ ते ५ घराची वसूली करण्यासाठी गेल्यास पूर्ण वसूली होवू शकते परंतू तसे होत नाही. असलेला कर्मचारीच जस्त आहे उलट कमी केला पाहिजे

सौ.लता दलाल : वर्ग -४ संवर्गातील कर्मचारी वसूलीसाठी दिलेले आहे. परंतू ते वार्ड कार्यालयात सही केल्यानंतर गायब असतात.त्याकडे का लक्ष दिले जत नाही. याची नोंद कोण ठेवते.

श्री.संजय शिरसाट : वार्ड कार्यालयात १० कर्मचारी काम करीत असेल तर तेथे १० शिपाई नुसते त्यांचे हाताखाली काम करण्यास आहे. काही अधिकाऱ्याच्या घरी जस्तीचे कर्मचारी दिलेले आहे. ते सर्व काढून वसूलीसाठी देण्यात यावे.

श्री.मो.जवेद मो.इसाक : प्रत्येक वेळी कर्मचारी कमी आहे असे उत्तर देवून सभागृहाची दिशाभूल करणे बरोबर नाही. जकात खाजगीकरण झाले. तेथील कर्मचारी कुठे दिलेले आहे. तसेच अनेक कामे खाजगी एजन्सीकडून बीओटीवर दिले जत आहे. लाईटचे खाजगीकरण केले लाईनमन काय काम करीत आहेत, त्यांना ही वसूलीसाठी पाठवावे. कामाचा व्याप कमी झाला वसूलीसाठी जस्तीचा कर्मचारी देवून वसूली व्हायला पाहिजे डॉग विभागाचे कर्मचारी ही कुत्रे पकडत नाही. त्यांनाही वसूलीसाठी द्यावे.

डॉ. आशा बिनवडे : उत्पन्न वाढविणे म्हणजे वसूली करणे खर्च कमी करणे या दोन्ही बाबीकडे लक्ष दिले पाहिजे ६५ कोटी अस्थापनेवर खर्च विकास कामावर २४ कोटी त्यातील १० कोटीची कामे स्पील ओव्हरची असतील हे बरोबर नाही. दोन्ही बाजूबघीतल्या पाहिजे

मा. सभापती : वार्ड अधिकारी ड यांनी खुलासा करावा.

वार्ड अधिकारी -ड : या वार्ड कार्यालय अंतर्गत एकूण १६९१९ मालमत्ता,थकबाकीमध्ये ५.२२ कोटी,चालू मागणी ३.३९ कोटी चालू मागणीमधील २.८१ कोटी वसूली म्हणजेच

८६ टक्के वसूली झाली. थकबाकीतील १.९६ कोटी ४० टक्के वसूली झालेली आहे. ३६ जत्तीच्या केसेस केल्या त्यातून २०.१८ लक्ष मिळाले.१९ मार्च पर्यत ४.८६ कोटी वसूली झालेली आहे.१५ लक्षचे धनादेश कॅशमध्ये आहे असे एकूण वसूली ५ कोटी पर्यत येते.एकूण डिमांडच्या ७५ टक्के वसूली झालेली आहे.

श्री.मुजेब खान : किती घरे नोंदीनुसार आढळूनच आली नाही. थकबाकी ज्यांचेकडे आहे त्या संपूर्ण घराची नोंद आपल्याकडे आहे काय?याचा सर्वे केला का?

वार्ड अधिकारी -ड : थकबाकीमध्ये जेजुनी वसाहत आहे वार्ड क्र २ मधील ती संपूर्ण या वार्ड कार्यालयात समावेश झालेले आहे.त्याचीच वसूली आहे.

श्री.मुजेब खान : अनेक जुन्या मालमत्ता दुसऱ्यास विक्री केल्या पुर्वीची थकबाकी ज्या नंबरवर होती ते खोडून सदर मालमत्ता नवीन नाव येवून चालू डिमांड लोक भरणा करीत आहे. मागिल थकबाकी जशाच्या तशी आहे.

वार्ड अधिकारी -ड : अशा १६२ प्रकरणे काढलेली असून २७ प्रकरणाची वसूली केली ३५ प्रकरणाचे मा. न्यायालयात वाद चालू आहे. बाकीच्या प्रकरणात वसूली करण्याचे काम चालू आहे. जुने घर डिमॉलीश करून मोठमोठे प्लॅट झाले . परंतू पूर्वीचा जे कमी टॅक्स होता तो बंद होत नाही.नवीन बांधकामानूसार टॅक्स मिळत आहे.

श्री.मुजेब खान : जुना जे टॅक्स होता तो बंद होत नाही त्यामूळे थकबाकी मध्ये रक्कम मोठी येत आहे.जुने घर पाडून नवीन इमारती होत आहे नवीन टॅक्स मिळतो परंतू जून्या घराची जी थकबाकी आहे ती मिळत नाही ती थकबाकी आजही बजेट बूक मध्ये दाखविली जत आहे. अशा घराचा सर्वे करून कार्यवाही करावी.

वार्ड अधिकारी -ड : पाणीपट्टीची थकबाकी ३.८० कोटी चालू डिमांड १.९८ कोटी ३.८० कोटी पैकी ९४.१८ लक्ष तर १.९८ कोटी मधून १.०५ कोटी वसूल झालेले आहे. ३५टक्के वसूली झालेली आहे.

मा. सभापती :वार्ड अधिकारी - ई यांनी वसुलीच्या संदर्भात खुलासा करावा.

वार्ड अधिकारी -ई : थकबाकी ३.६४ कोटी चालू मागणी १.०३ कोटी मालमत्ता करापोटी ८६.०७ लक्ष वसूल झाले. पाणीपट्टी ची थकबाकी ४.२५ कोटी चालू मागणी २.२५ एकूण मागणी ६.५०कोटी असून पाणीपट्टीची वसूली १.५९ कोटी झालेली आहे.या वार्ड अंतर्गत गुंठेवारीचा मोठा भाग येतो व गुंठेवारीची कार्यवाही सुरू झाल्यामूळे नागरीकांना कर भरण्यास मोठा अडथळा निर्माण झालेला आहे. तसेच चिकलठाणा हा भाग ग्रामिण असल्यामुळे तेथील रहिवासी हे शेतकरी असून कराची नोटीस दिल्यानंतरही कर भरण्यास असमर्थता दाखवितात.

वार्ड अधिकारी -फ : एकूण मालमत्ता २४१४९ थकबाकी ४.४५ कोटी चालू मागणी ३.७५ एकूण उद्दिष्ट ८.३१, थकबाकीतील वसूली १.६३ कोटी चालू मागणीतील वसूली २.२६ अशी एकूण वसूली ३.८९ कोटी ५ लक्षचे कॅश धनादेश आहे ते मिळून एकूण ३.९४ कोटी उद्दिष्ठाच्या ४८ टक्के वसूली झालेली असून जत्तीचे एकूण ३४ प्रकरणे केली. त्यांचेकडे १९ लक्ष थकबाकी होती त्यापैकी ९.२७ लक्ष वसूल केले. गूंठेवारीचे ३० भाग असून मूळ घरमालक घर विकून दुसऱ्याच व्यक्तीचे तेथे नाव दिसून येते. त्यामूळे मागिल वसूली करण्यास अडचण येत आहे.गेल्या वर्षी १ लक्ष थकबाकीचे प्रकरण निरंक केलेले होते. जी थकबाकी होती ती या वर्षी वसूल केलेली आहे.

ज्यांचेकडे ५० हजर पेक्षा जस्त कर आहे त्यांचे मालमत्तेची जप्ती करण्याची कार्यवाही केली २० ते २५ हजर थकबाकीदार असून ते सर्व निवासी असल्यामूळे जप्तीसाठी अडचण येते. काही प्रमाणात का होईना वसूली करीत आहे.

वार्ड अभियंता -फ : एकूण नळ कनेक्शन ११३४८ असून थकबाकी ५.०९ कोटी चालू मागणी २.०८ कोटी एकूण मागणी ७.१७ कोटी, वसूली १.८० कोटी झालेली आहे आणखी ६० ते ७० लक्ष अशी वर्ष अखेर पर्यंत २.५० ते २.७५ काटी पर्यत वसूली होईलअसा अंदाजआहे

श्री.मुजीब खान : काही वार्डसाठी १ कोटी पर्यत तरतूद केली तर काही वार्ड साठी ४ ते ५ लक्ष तरतूद केलेली आहे. अनेक महत्वाची कामे समावेश करावी म्हणून पत्र दिले असतांना कामाचा समावेश केला नाही.

मा. आयुक्त : ४३ कोटी वार्ड कार्यालयास व ३० कोटीचे बजेट मुख्य कार्यालयासाठी ठेवलेले होते. स्पील ओव्हरच्या कामाची यादी वेगळी न करता रेग्यूलर बजेट मध्ये नमूद केलेली आहे त्याचे कारण असे की स्पील ओव्हरची कामे आल्यानंतरही अनेक कामे त्याच वार्डाची येतात त्यामूळे इतर वार्डात कामे करण्यास अडचण येते. २३ लक्ष पासून १.५० कोटीपर्यत प्रत्येक वार्डसाठी बजेट आहे. वार्ड कार्यालयासाठी ४३ कोटी आहे त्यात प्रत्येक वार्डसाठी ४१ ते ४२ लक्ष आलेले आहे. ४३ कोटीतील १३ -१४ कोटी स्पील ओव्हरचे व उर्वरीत नवीन कामाचे आहे. मुख्य कार्यालयासाठी ३० कोटी पैकी ९ कोटी पाणीपूरवठा व २० कोटी ड्रेनेजव रस्त्यासाठी देण्यात आलेले आहे. जर रस्ता मोठा असेल तर वार्डनिहाय अलग करता येत नाही. सरासरी प्रत्येक वार्डात १० ते २० टक्केचा फरक असेल.मुख्य कार्यालयाकडील बजेटमधून सर्व वार्डाना समान तरतूद का झाली नाही संबधीत अधिकारी यांचेकडून खूलासा घेऊ.

श्री.मुजीब खान : रोषण गेट ते चंपा मस्जेद व्यतिरिक्त कोणत्याही रस्त्याचे डांबरीकरण केलेले नाही.

अति.शहर अभियंता :स. सदस्य श्री. मुजीब खान यांचे वार्डात नवीन डांबरीकरणाचा समावेश यामूळे केला नाही की मागिल वर्षातील जे काम आहे ते एप्रिल पर्यत पूर्ण करणार आहोत.कटकट गेट ते पोलीस मेस पर्यतच्या रस्त्याचे कामाचे ३.५० कोटीचे टेंडर होवून सबमिशन झालेले आहे डिफर्ड पेमेंन्टमध्ये त्यास घेतलेले आहे. रविंद्रनगर ते कटकट गेट या डी.पी. रस्त्याचे काम नुकतेच सर्वसाधारण सभेने मंजूर केले. जे ५० कोटीच्या रस्त्याच्या कामासाठी मंजूरी दिली त्यात समावेश केलेला आहे.

श्री.मुजीब खान : दोन वर्षापासून कामे होत नाही. प्रत्येक वर्षी अशीच उत्तरे मिळतात कामे होत नाही.

श्री.मो.जवेद मो.इसाक : काही वार्डात १ कोटीपर्यत तरतूद केलेली आहे अनेक सदस्यांनी कामाच्या नावासही पत्र दिले होते ते का समावेश झालेले नाही.

श्री.मुजीब खान : लाईटसाठी वार्ड कार्यालय अ साठी २३ लक्ष, ब साठी ३० लक्ष, क साठी फक्त १० लक्ष तरतूद केली. वार्ड ड साठी ५० लक्ष वार्ड ई साठी ४१ लक्ष फ साठी ४३ लक्ष बजेट दिले. वार्ड कार्यालय क मध्ये १७ वार्ड येतात त्यासाठी साठी १० लक्षच का दिलेले आहे.७० वार्ड साठी जस्तीचे बजेट दिले व इतर ३० वार्ड साठी किती बजेट दिले कळायला मार्ग नाही.

कार्य. अभियंता(विद्यु.) : ३४ लक्षची लाईटसाठी तरतूद आहे. १० लक्ष नाही.

मा. आयुक्त : जेकाही टारगेट दिलेले आहे त्यात जस्तीची वाढ करू नये अशी विनंती आहे.

श्री.संजय शिरसाट : वार्डवाईजवसूलीच्या प्रमाणात विकास कामे टाकलेली आहे काय?

मा. आयुक्त : वसूलीच्या प्रमाणकानूसार नाही. ५ कोटी सर्व वार्डाना दिले. ३० कोटी येते. त्यावेळची १३ कोटीची वसूली होती.असे ४३ कोटी सर्व वार्डाना दिले आहे. काही वार्डात मोठे रस्ते आहे. त्यामूळे ५ लक्ष मध्ये काम होणार नाही म्हणून सर्वांना सारखेच दयावे म्हणून त्यावेळी वार्ड कमेटीने ३५ ते ४५ लक्षच्या दरम्यान कामे आलेली आहे.

श्री.मो.जवेद मो.इसाक : मुख्य कार्यालयाकडून काहीही बजेट ठेवलेले नाही वार्ड कार्यालयाकडून दिलेले आहे.पत्र देवूनही माझे वार्डसाठी संरक्षित भिंतीचे बजेट ठेवले नाही.

मा. आयुक्त : मागिल वर्षी ज्या वार्डाचे स्पील ओव्हरची कामे बाकी आहे त्यांना या वर्षी कमी रक्कम मिळेल.जेथे एक कोटीपर्यत कामे आहे त्यात स्पील ओव्हरची कामे आहेत.

कार्य.अभियंता(ड्रे.विद्यु.) : लाईटचे बजेट सर्वच वार्डसाठी आहे. ड्रेनेजचे आवश्यकतेनूसार ठेवलेले आहे.

श्री.त्र्यंबक तुपे : मी पत्र दिले होते सर्व वार्डात समान तरतूद का केली नाही.ज्या वार्डात जस्त तरतूद केली आता जी वाढ करणार आहे त्या वार्डसाठी करण्यात येवू नये.

श्री.रविकांत गवळी : प्रत्येक वार्डात विकास कामासाठी स. सदस्यांनी कामासहीत पत्र दिलेले आहे. परंतू ती ती कामे यात आलेली नाही कमी जस्त झालेले आहे. चर्चेसाठी पाच तास कमी पडतील. जेकाही दुरूस्ती करायची आहे त्यांचे सर्व अधिकारी सभागृहाच्या वतीने मा. सभापतीना देण्याची विनंती करतो.

श्री.त्र्यंबक तुपे : सभागृहाच्या वतीने अर्थसंकल्पात फेर बदल करण्याचे अधिकार मा.सभापती यांना देण्यात यावे.

मा.सभापती : सभागृहातील सर्व सदस्यांच्या भावना लक्षात घेवून या पूर्ण अर्थसंकल्पात आवश्यक ते फेरबदल निश्चितपणे केले जतील.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्यानुसार प्रशासनाने मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 103 व 104 नुसार सन 2006-07 चे सुधारित अंदाज व मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 95 नुसार सन 2007-2008 चे मुळ अंदाज मा.स्थायी समिती सभागृहासमोर सादर करण्यात आले. सदर बैठकीत सर्वकष चर्चा होऊन सन 2006-07 चे सुधारित अंदाज जमा रक्कम रू.211 कोटी 65 लाख 65 हजार, यामध्ये प्रारंभीची शिल्लक 53 कोटी 09 लक्ष 20 हजार असे एकुण 264 कोटी 74 लक्ष 85 हजार रक्कमेचा विचार करून खर्च रक्कम रू.225 कोटी 88 लाख 45 हजार इतका लक्षात घेता रू.38 कोटी 86 लाख 40 हजार शिलकीच्या सुधारित अंदाजास मंजुरी देण्यात येते.

सन 2007-08 च्या मुळ अंदाजावर सर्व सदस्यांनी अभ्यासपुर्वक चर्चा करून व केलेल्या सुचनांची दखल घेऊन मुळ अंदाज पत्रक रू.279 कोटी 01 लाख 15 हजार यामध्ये प्रारंभीची शिल्लक रू.38 कोटी 86 लाख 40 हजार असे एकुण रू.317 कोटी 87 लाख 55 हजार जमेचा विचार करून खर्च रू.317 कोटी 70 लाख 15 हजार अपेक्षित धरता रू.17.40 लाखाच्या शिलकी अंदाजपत्रकास जमा व खर्च बाजुच्या प्रस्तावासह सर्वानुमते मान्यता देण्यात येते. सभागृहात झालेल्या चर्चेप्रमाणे प्रशासनातर्फे सन 2006-07 च्या सुधारित व सन 2007-08 चे मुळ अर्थसंकल्पात सभापती, स्थायी समिती व स.सदस्यांच्या सल्ल्यानुसार फेरफार व दुरूस्ती करण्यात येऊन प्रस्ताव फेरफार/दुरूस्तीसह मान्य करून मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीकरीता सादर करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येत आहे.

राष्ट्रगीता नंतर सभा संपल्याचे मा.सभापती यांनी घोषित केले.

**नगर सचिव**

महानगरपालिका औरंगाबाद